# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलोरोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'.MeloRoad,Fort, Mumbai-400 001E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360 website: www.msbnpe.org


क्र. मराशुवपशिम/सुचना/ ४०७ /२०२५ दि.२४/०१/२०२५

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य/ संस्थाप्रमुख,
ए.एन.एम व जी.एन.एम सलग्नित संस्था

विषय:- अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सन २०२३-२४ (ZOOM APP) व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे कार्यशाळा बाबत.

संदर्भ:-शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) ४१२, ई, बहिरट पाटील चौक, मॉडल कॉलनी शिवाजी नगर पूणे यांचे पत्र क्र. उशिसं/सांख्यिकी/ AISHE /२०२३-२४/२०२४ दि.१२/१२/२०२४ चे पत्र मंडळास प्राप्त.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्व्ये कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाकडे सलग्नित असलेल्या ए.एन.एम व जी.एन.एम अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचे प्राचार्य/ संस्थाप्रमुख, शासकीय, निमशासकीय व खाजगी, अनुदानीत/विनाअनुदानीत सर्व ए.एन.एम व जी.एन.एम अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना AISHE CODE असणे बंधनकारक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर www.aishe.gov.in वर WEB DCF मध्ये माहिती भरण्याची व अपलोड करणेबाबतची वेबलिंक सुरू झालेली असून अंतिम मुदत दिनांक १५/०२/२०२५ अशी आहे. WEB DCF माहिती भरतानां उपरोक्त संस्थांना काही अडचणी येत असतील तर त्या अडचणी सोडविण्यासाठी मंडळाने अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) पुणे यांच्या सोबत मुंबई व पूणे विभागाकरीता दिनांक १०/०१/२०२५ रोजी (ZOOM APP) व्हिडीओ कॉन्फरन्सिग द्वारे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

**नागपूर विभागाकरीता दिनांक २८/०१/२०२५ रोजी (मंगळवार) दूपारी ३:०० वाजता व औरंगाबाद विभागाकरीता दिनांक ३०/०१/२०२५ रोजी (गुरूवार) दूपारी ३:०० वाजता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) सन २०२३-२४ (ZOOM APP) व्हीडीओ कॉन्फरन्सिग द्वारे कार्यशाळा महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येत आहे. कार्यशाळेच्या दिवशी (ZOOM APP) व्हिडीओ कॉन्फरन्सिगची लिंक मंडळाच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात येईल. मुंबई व पूणे विभागातील ए.एन.एम व जी.एन.एम नर्सिंग अभ्यासक्रमाच्या संस्थाना AISHE बाबत काही समस्या असतील तर संबधीत संस्थानी देखिल (ZOOM APP) व्हिडीओ कॉन्फरन्सिग व्दारे कार्यशाळेस हजर राहण्यास हरकत नाही.**

तथापि, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यांच्या वेबपोर्टलवर माहिती भरून अपलोड केल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता आपल्या संस्थेला प्राप्त झालेले AISHE प्रमाणपत्र mahadbtmsbnpe2024@gmail.com वर ई-मेल व्दारे पाठविण्यात यावे. WEB DCF माहिती विहित मुदतीत न भरल्यास विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानास सर्वस्वी संस्थाप्रमुख/प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर:
१) मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तथा आयुष विभाग, मुंबई.
२) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई